# महर्षि अण्णासाहेब पटवर्धन

## चरित्र

: लेखक :

अप्रबुद्ध


मूल्य : ११ रुपये

सन - १९९८

प्रकाशक -
श्री गुरु अण्णासाहेब पटवर्धन समाधि मंडळ
२२०, शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०.

मुद्रक -
द. श्री. गानू
रॅशनल प्रिन्टर्स
२१६, नारायण पेठ,
केळकर रस्ता, पुणे ४११ ०३०.

॥ श्रीः ॥



महर्षि अण्णासाहेब पटवर्धन

# प्रास्ताविक चार शब्द

॥ श्री नरसिंह सरस्वती प्रसन्न ॥

या पुण्यपत्तनांतील एका अत्यंत थोर व महत्त्वाच्या विभूतीचें हे अतिशय सुलभ रीतीनें लिहिलेलें बालोपयोगी चरित्र बालमित्रांच्या हाती देण्यांत आम्हांस फार संतोष होत आहे. पुण्याच्या इतिहासांत श्री. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचे महत्त्व काय आहे व स्थान किती अढळ आहे हे या चरित्रावरून साधारण समजदार वयाच्या कोणाहि मुलास सहज समजू शकेल. इंग्रजांच्या मायावी राजवटीत सामान्य जनतेच्या मनांत आपल्या अस्तित्वाची जाणीव जागृत ठेवण्याचे कार्य ज्या कित्येक थोर विभूतींनी केले, त्यांत श्री. अण्णासाहेब हे अग्रेसर होते. महाराष्ट्र ही नररत्नांची खाण आहे. गेल्या शतकांत तिच्यातून जी तेजस्वी रत्ने बाहेर पडली त्यांच्यांत लोकमान्य टिळक, महर्षि अण्णासाहेब हे सर्वश्रेष्ठ होत असें म्हटले तर चूक होणार नाहीं. सबब त्यांच्या चरित्राचे परिशीलन करून त्यापासून बोध घेत असता त्यांच्या ठिकाणच्या निरनिराळ्या गुणांचे व व्यक्तिमत्त्वाचे दर्शन वाचकांस सहज होईल आणि पुन्हा त्यांचा कोठे घोटाळा होणार नाहीं अशा प्रकारचें धोरण लेखकाने ठेवले आहे ते फारच योग्य आहे. तरी माझ्या बालमित्रांनी सदर चरित्राचें परिशीलन अवश्य करावें एवढी श्री पांडुरंगानी त्यांना बुद्धि द्यावी ही प्रार्थना करून हा प्रस्ताव संपवितो.

**मा. गो. गोडबोले**

॥ श्री ॥

# आरती श्री अण्णासाहेब यांची

जयदेवा योगेश्वरा । विनायका गुरुवरा ॥
आरती ओवाळीतो । प्रेमाच्या माहेरा ॥ धृ० ॥
लोपला वेदमार्ग । लया ब्राह्मण्य गेलें ॥
सोडुनी स्वाभिमान । परबुद्धि झाले जन ॥ १ ॥
हीन दीन दशा आली । दुजी आशाच नुरली ॥
देवाच्या कृपेंवीण । दैवहीनां नुमजें तें ॥ २ ॥
जाणुनी पुण्यग्रामीं । महाराष्ट्र पुण्यभूमी ॥
ब्राह्मण्य मूर्तिमंत । दावियेलें आचरोनी ॥ ३ ॥
गायत्रीमंत्रराज । व्यक्त दाखवीलें बीज ॥
जीव हा विश्वकाय । स्वयं ब्रह्मचि केवळ ॥ ४ ॥
परमात्मा गुरुमूर्ति । नरसिंहसरस्वती ॥
सच्छिष्य रहाटीनें । प्रार्थिलें जन्मवरीं ॥ ५ ॥
सकळां अंतर्यामीं । पूर्ण प्रगट व्हावें ॥
हीनता सर्व जावीं । इहपर मुक्तीसी द्यावें ॥ ६ ॥

*प्रतिवर्षी महर्षि अण्णासाहेबांचा पुण्यतिथी उत्सव,*
*माघ शु. ५ ते माघ शु. ११ पर्यंत*
*त्यांचे समाधि मंदिरात साजरा करण्यात येतो.*

॥ श्री ॥

# महर्षि अण्णासाहेब पटवर्धन

- - - - - - - - - - -

## ‘ संकेतरेखा नवभारतस्य ’

### राष्ट्र ऱ्हास कां पावते ?

इतिहासकालांतील अनेक राष्ट्रें आणि भारतवर्ष यांच्याकडे पाहिले असतां, भारतवर्षाचा एक विशेष चटकन लक्षांत येतो. आजवर पृथ्वीच्या पाठीवर अनेक राष्ट्रें उदयास आली आणि वाढली. त्यांतील कित्येकांनी त्या त्या देशकालानुरूप वैभव आणि उन्नति यांचें उत्कर्षहि पाहिले आणि ती नष्टहि पण झाली. अत्यंत जुनी राष्ट्रें असून आजतागायत जिवंत आहेत अशी उदाहरणें फक्त दोनच आहेत. एक भारतवर्षाचें आणि दुसरें चीन देशाचें. परंतु भारतवर्षांत व चीनमध्ये एक फार मोठा फरक आहे. जसा एखादा वृक्ष वाढतो व त्याच्याकडे फारसें कोणाचें लक्ष न जातां आपल्या ठिकाणींच प्रचंड रूपाने जगत असतो, तशीच चीनची गोष्ट आहे. अतिशय विशाल देश खरा तरी उपवनांत एकीकडे वाढणाऱ्या विशाल वृक्षाप्रमाणे पृथ्वीच्या एका भागांत तो वाढला आणि अंतर्गत घडामोडी कितीहि घडल्या असल्या तरी विशेषशी स्थित्यंतरे न अनुभवितां आणि पृथ्वीच्या पाठीवरील इतर राष्ट्रांशी म्हणण्यासारखे संबंध कोणतेच न येतां, हजारों वर्षे जगला. तशी गोष्ट भारतवर्षाची नाहीं. भारतवर्षानें अनेक स्थित्यंतरें

अनुभविली, जगांतील अनेक मोठमोठ्या राष्ट्रांशी त्यांचे बरे वाईट संबंध आले; वैभव आणि उन्नति यांचे उत्कर्ष अनेक वेळा अनुभवून कैकवेळा ऱ्हासहि पाहिले. उत्कर्ष अनुभवून ऱ्हास पावलेल्या राष्ट्रांचा असा अनुभव आहे, की मग ती पूर्णपणे नष्टच झाली. त्यांना पुन्हा आपले डोके वर करता आले नाहीं. भारतवर्षाची मात्र तशी गोष्ट नाहीं. कालिदासाने म्हटल्याप्रमाणे "नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण," म्हणजे रहाटगाडग्याप्रमाणे, पुनः पुन्हा खाली जाणे व पुनः पुन्हा वर येणे हा जणू कांहीं त्याचा स्वभावच दिसतो. ऐतिहासिक दृष्ट्या ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

इतर राष्ट्रांच्या व त्याच्या इतिहासांत हा जो फरक पडला आणि सापाने कात टाकावी त्याप्रमाणे अवदशेचा त्याग करून पुनः पुन्हा उत्कर्ष पावण्याचे त्याला साधेल त्याचे रहस्य एकाच गोष्टीत आहे. ज्या वेळेस पृथ्वीच्या पाठीवरील एखादा मानवसमाज सामान्य आचारविचारांचा आग्रह धरून जगत असतो, त्यावेळेस त्या राष्ट्रीयतेचें रहस्य कांहीं विशेष श्रद्धांत असते. ह्या श्रद्धा जोपर्यंत त्याच्या अंतःकरणात जिवंत असतात, तोपर्यंत त्याला ह्या लोकांकडून आपल्या कांही वेगळेपणाची विशेष जाणीव सतत होत असते. ही त्याची विशेष जाणीव नष्ट झाली म्हणजे राष्ट्र या दृष्टीने त्याचे अस्तित्वहि नाहींसे होते. अशा प्रकारच्या जाणिवेला राष्ट्राची 'अस्मिता' म्हणतात. अनेक आपत्ति अनुभवून आणि कित्येक वेळा ऱ्हास पावून देखील भारतराष्ट्र नष्ट झालें नाहीं याचें कारण हेंच आहे, की त्याची 'अस्मिता' कधीहि नाहींशी झाली नाहीं.

रोमसारख्या प्रतापशाली राष्ट्राचा ऱ्हास कां झाला याविषयी विचार करतांना "युरोपियन सिव्हिलिझेशन्" या ग्रंथाच्या कर्त्याने असे म्हटलें आहे कीं, जातीयता, वांशिक ऱ्हास, इत्यादि सर्व कारणें अवांतर आहेत. ज्या तत्त्वज्ञानाने त्यांच्यांत विशेष बुद्धिमत्ता आणि आत्मिक बल उत्पन्न केलें होतें, त्या तत्त्वज्ञानावरील लोकांची निष्ठा नाहींशी झाली हेंच त्या ऱ्हासाचे खरें कारण आहे. चक्रगतिक्रमाने उत्कर्षास पावलेल्या राष्ट्रास देखील अनेक प्रकारांनी ऱ्हास अनुभवावा लागतो. ह्या ऱ्हासाच्या काळांत वर सांगितल्याप्रमाणें विशेष बुद्धिमत्ता आणि आत्मिक बल ह्यांनी युक्त असलेली 'अस्मिता' ज्या तत्त्वज्ञानानें घडवून आणलेली असते त्याच्यावरील निष्ठा अढळ राखण्याचे प्रयत्न जर न झाले तर राष्ट्राचा सर्वस्वी ऱ्हास होऊन विशेष बुद्धिमत्ता व आत्मिक बलहि नाहीसें होतें, व ते राष्ट्र भूतकालांत जमा होतें. भारतवर्षाचें विशेष भाग्य हेंच आहे की, अशा प्रकारच्या ऱ्हासकालांत त्याच्या तत्त्वज्ञानावरील निष्ठा अढळ राखू शकतील, अशा प्रकारचे लोकोत्तर पुरुष त्याच्या ऱ्हासकाली उत्पन्न होत गेले व त्यांनी देशांतील बहुजनसमाजाची पूर्वतत्त्वावरील निष्ठा युक्तिप्रयुक्तीनें अढळ राखली. त्यामुळे कालाच्या ओघांत राष्ट्र जीव धरून राहिले. आणि ऱ्हास कारणांचा

जोर कमी झाल्याबरोबर प्रत्येक वेळेला त्यानें डोकें वर काढलें.

## अण्णासाहेबांचें खरें कार्य

अशा प्रकारचा पूर्वी कधीहि न अनुभवलेला भयंकर ऱ्हासकाल येथें इंग्रजांची सत्ता सुरू झाल्यापासून झाला हे आपण सर्व जाणतोच. पूर्वी कधी न अनुभवलेला असें म्हणण्याचें कारण हें की, पूर्वीचे ऱ्हास बाह्य आपत्तीमुळे झालेले होते, म्हणजे परकीयांचा जुलूम केवढाहि असला तरी मनुष्याचीं अंतःकरणें व निष्ठा यांना धक्का लागला नव्हता. त्या अढळ होत्या. इंग्रजीसत्तेची गोष्ट तशी नव्हती. परकीय अमलाचा जाच तर होताच पण त्यापेक्षाहि जनतेची आपल्या मूलतत्त्वांवरील निष्ठा उडवून लावण्याकरिता इंग्रजांनी केलेले अनेक प्रयत्न जास्त घातक व भयंकर होते. त्यामुळे सारें राष्ट्रच त्याच्या 'अस्मिते'चा विसर पडून भूषणकवीच्या कालाप्रमाणे सुन्ता न होता अहिन्दू होतो की काय अशी भीति उत्पन्न झाली होती. अशा स्थितींत कांही लोकांची निष्ठा तरी अढळ राखून राष्ट्राला अस्मितेचा विसर न पडू देण्याचे कार्य ज्या कांही थोड्या विभूतींनी केले त्यापैकी एका विभूतीचें चरित्र मी तुम्हाला आतां थोडक्यांत सांगणार आहे.

## पूर्वपीठिका

लोकमान्य टिळकांचें नांव ज्याला माहीत नाही असा कोणी अभागी अजून तरी महाराष्ट्रांत असेल असे वाटत नाही. लो. टिळक ज्यांना सर्व प्रकारे गुरुस्थानी मानीत त्या महर्षि श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांचे सबंध नांव विनायक रामचंद्र पटवर्धन असें होतें. कोकणात पेशव्यांच्या आरमाराचे अधिपति धुळप म्हणून होते त्यांच्या पदरी श्री. अण्णासाहेब यांचे पूर्वज फडनिशी करीत असत. श्री अण्णासाहेब यांचे तीर्थरूप रामचंद्र भाऊसाहेब हे आपले नशीब काढण्याकरिता इ. स. १८०० च्या सुमारास पुण्यास आले. त्यावेळीं पुण्यास प्रसिद्ध असलेले रामचंद्र नाईक, सावकार यांचेकडे श्री. भाऊसाहेब यांची थोरली बहीण दिली होती. तिच्याकडे भाऊसाहेब राहात असत. पेशवाईच्या अंतकाळीं बाळाजीपंत नातूंसारख्या नराधमाने हिंदवी सत्तेचा झेंडा आपल्या हाताने उतरून इंग्रज सरकाराचे निशाण तेथें लावलेले भाऊसाहेबांच्या डोळ्यांनी पाहिले, तेव्हा ते १८ वर्षांचे म्हणजे त्या काळाच्या मानाने कर्ते सवरते होते. पेशवाईचा अंत झाल्यावर भाऊसाहेब सुरतेस गेले, तेथे त्यांनी त्या वेळची वकिली परीक्षा देऊन कांहीं दिवस मुंबईस वकिली केली. परंतु तेथील हवा त्यांना न मानवल्यामुळे ते पुन्हा पुण्यास परत आले ते अखेरपर्यंत तेथेच होते. प्रथम कांहीं दिवस बहिणीकडेच राहात असत. परंतु पुढे परांजप्यांच्या वाड्याजवळ शनिवारवाड्याच्या विजापूर दरवाज्यासमोर एक स्वतःचा वाडा त्यांच्या पत्नीने बांधला. त्यात ते राहावयास गेले.

भाऊसाहेबांच्या पत्नीचें नांव जानकीबाई असें होते. जानकीबाईंचा स्वभाव विलक्षण करारी व अभिमानी पण तपस्वी आणि श्रद्धाळू असा होता. स्वतःचा वाडा, मोठा परिवार,

चार आश्रित मंडळी, स्नेहीसोबती, नोकरचाकर, मेणागाडी इत्यादि ऐश्वर्य केवढेंहि मोठें असलें तरी जानकीबाईंच्या भाग्यात एक मोठा उणेपणा होता. मुली झाल्या होत्या. पण पुत्रसंतान नव्हते याचे त्यांना वाईट वाटे. परंतु वाईट वाटून स्वस्थ बसणारी आणि जागच्या जागी हळहळणारी ती बाई नव्हती. ही आपत्ति दूर करण्याचा निश्चय करून, त्या काळच्या समजुतींना अनुसरून तपादि कडक उपायांनी आपले मनोरथ पूर्ण करून घेण्याची त्यांनी कांस बांधली. त्याप्रमाणे त्यांना एक मुलगाहि झाला. परंतु दुर्दैवानें तान्हेपणीच तो एकाएकी किंकाळी फोडून मरण पावला. असे सांगतात, की दुष्टपणाने त्याच्यावर कोणी मंत्रप्रयोग केला होता. प्रयोग करणारा कोण होता ते जानकीबाईस ठाऊक होते व तो प्रयोग उलटून देणारा मनुष्यहि त्यांस माहीत होता. परंतु प्रयोग उलटविला असता तर करणाऱ्याचा मृत्यु ओढवला असता म्हणून केवळ जानकीबाईंनीं त्यास संमति दिली नाहीं. हे थोरपण श्री. अण्णासाहेब यांच्या मातोश्रींस साजण्यासारखेच होते. आघात झाला म्हणून कंबर खचून उद्योग सोडून देणे त्यांना ठाऊकच नव्हते. उलट त्यायोगे यांना दुप्पट अवसान मात्र आलें. कोणत्याहि मंत्रतंत्रांना भीक न घालणारे आदिशक्ति परमेश्वरी कृपेचे सामर्थ्य अंगी आणण्याकरिता पटवर्धनांचे कुलदैवत जे श्री गजानन त्याची त्या देहावर उदार होऊन सेवा करू लागल्या, त्यांना ध्यानयोगाचा अभ्यास होता, व ध्यानयोगांत त्यांची प्रगति पुष्कळच झाली होती. मेण्याशिवाय घराबाहेर न पडणाऱ्या जानकीबाई श्री गुंडाच्या गणपतीस रोज पायी जाऊन प्रदक्षिणा घालू लागल्या. प्रदक्षिणा घालता घालता त्यांचे पाय सुजून जात. शेवटी मंगलमूर्तीने तेथील पुजाऱ्यास दृष्टांत दिला की, जानकीबाईस सेवा पुरे करण्यास सांगावे. परंतु त्या तेजस्वी बाईने असें उत्तर दिलें, की देवाने तुम्हाला सांगितले ते मला का नाही सांगितले. प्रत्यक्ष मला सांगितल्याखेरीज मी नियम सोडणार नाही. शेवटी श्री गजाननाने दर्शन देऊन त्यांच्या पायावर तीर्थ शिंपडले. देवाला जातांना पायावर मोठी सूज होती. परत येऊन पाहतात, तो ती सूज नाहीशी झाली होती.

## त्यांच्या मातुःश्री

संकष्टी चतुर्थीला त्या सूर्योदयाला उभ्या राहून चंद्रोदय होईपर्यंत उभ्याउभ्याच जप करीत. शेवटी या तपश्चर्येचें फळ त्यांच्या पदरांत पडलें, शके १७६९ च्या वै.व. चतुर्थी मंगळवारी म्हणजे इ.स. १८४७ मे ४ या दिवशी प्रातःकाळी श्री. अण्णासाहेब यांचा जन्म झाला. त्यानंतर सुमारे दोन वर्षांनी त्यांस आणखी एक मुलगा झाला. श्री. अण्णासाहेब व नानासाहेब या जोडीमुळे त्यांचा संसार सार्थ झाला. परंतु त्यांनंतर पुढे त्या लवकरच कालवश झाल्या. त्यांच्याविषयी पुष्कळ आख्यायिका श्री. अण्णासाहेब सांगत. त्यांतील एकीचा येथे निर्देश करून आता श्री. अण्णासाहेब यांचेकडे वळू. सन १८५७ चे बंडाचे वेळी तिकडील बातम्या कळण्याची तळमळ इकडील मंडळीस लागत असे. परंतु आगगाड्या, तार, टेलिफोन

इत्यादि आजकालची सामग्री त्यावेळी नसल्यामुळे ताबडतोब बातमी कळण्यास कांहीं मार्ग नव्हता. तेव्हा जानकीबाईंनी ध्यानस्थ होऊन सर्व वृत्तांत सांगितला आणि पुढे आलेल्या पत्रावरून तो सारा खरा ठरला. परंतु त्यामुळे त्यांच्यामागे एक उपद्रवच लागला. मंडळी पुनः पुन्हा प्रश्न विचारू लागली तेव्हा जवळचा एक आरसा घेऊन त्यांनी सांगितले की धूपदीप दाखवून आरशांत पहा म्हणजे सर्व कांही दिसेल, व त्याप्रमाणे ते दिसत असे असा स्वतःचा अनुभव श्री. अण्णासाहेबांनी सांगितला. जानकीबाईंच्या मरणानंतर कोणाच्या तरी हलगर्जीपणाने तो फुटला आणि त्याचा गुण नाहीसा झाला.

## स्वभाव व बालपण

श्री. अण्णासाहेब यांचे हाडपेर जन्मापासूनच बळकट व शरीर बांधेसूद होते. रंग गोरा असून दृष्टी मोठी तीव्र होती. हट्टीपणा, श्रद्धाळूपणा, चैनीचा तिटकारा, बुद्धिमत्ता, सामर्थ्य, अचाट स्मरणशक्ति, दयाळुत्व, अलोलुप्त्व, तेजस्विता, प्रखर स्वाभिमान, निर्भयता, कोणत्याहि गोष्टीची अनुभवाने खात्री करून घेण्याची तयारी आणि विश्वकुटुंबिता हे सारे गुण त्यांच्यात लहानपणापासूनच होते. एकटे राहणें, किंवा कोणतीहि सुखाची गोष्ट एकट्याने करणें त्यांना कधी आवडले नाहीं. दहा पंधरा समवयस्क स्नेही त्यांच्या घरीं पडलेले असत. मर्दानी खेळांचा शौक, दांडगाई व मारामारी यांचा आनंद, हा असूनही त्यांत प्रावीण्य संपादण्याकडे त्यांचे विशेष लक्ष नव्हतें. त्यांचे डोके नेहमीच मोठमोठ्या विषयांत गढून गेलेले असे. भीति ही कधी त्यांच्या मनाला शिवलीच नाही. पिशाच्च पाहूनहि भीति न वाटता उलट त्यांना गम्मतच वाटे.

एखादी गोष्ट कठीण म्हणून सोडून देणे त्यांना आवडले नाही. कठीण प्रसंग असला म्हणजे त्यांना दुप्पट अवसान येई. इंग्रजी शाळेत गेल्यावर दोन इयत्तांचा एकदम अभ्यास करण्याची त्यांना परवानगी मिळाली. परीक्षेच्या वेळी हे तिसरीच्या मुलांतच जाऊन बसले. परीक्षकांच्या कानांवर ही गोष्ट गेल्यावर त्यांनीं सांगितलें की तू मोठा उद्धट दिसतोस. नापास झालास तर उलट पहिलीत बसवीन. अण्णासाहेब त्या गोष्टीला तयार झाले. पुढे साहेबांनी परीक्षा घेतली त्यावेळी कांहीं पाठ म्हणून दाखवीत असतांना यांनी सांगितले, 'साहेब पान उलटा. *Being* चे *ing* सत्तराव्या पानावर आहे' अशाच रीतीने हायस्कूलचे शिक्षण पुरे करून सन १८६४ त ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे सुमारे १४ वर्षांचे असता शुक्रवारांत लोणीविके दामले म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचे येथील मुलीशी त्यांचे लग्न झालें. त्यांच्या पत्नीचें नांव रमाबाई असें होतें. वर्णानें काळ्यासावळ्याच असल्या तरी त्या अतिशय सुस्वभावी होत्या.

## त्यांचा हूडपणा

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर ते डेक्कन कॉलेजमध्ये गेले. त्या वेळच्या त्यांच्या

शरीरबळाच्या व हूडपणाच्या अनेक गोष्टी सांगतात. त्यांची राहणी निर्व्यसनी परंतु श्रीमंतीस साजेशी थाटाची व हौशी अशी होती. पुण्यास त्यावेळेला बापूसाहेब मेहेंदळे हे सुप्रसिद्ध वैद्य होते. एकदा त्यांच्याकडे जाऊन हे औषध मागू लागले. त्यांनी विचारले, 'तुला काय होत आहे?' हे म्हणाले, 'भूक वाढण्याकरिता औषध पाहिजे.' वैद्याने रोजच्या खाण्याची चौकशी केली तेव्हा यांनी सांगितलें की आपण फक्त चौदा पोळ्या व अदपाव तूप खातो. तेव्हा वैद्याने एक अतिशय जलाल भस्म अगदी थोड्या प्रमाणांत सात पुड्या करून दिले व रोज सात दिवस घेण्यास सांगितले. घरी गेल्यावर यांनी विचार केला 'रोज गुंज गुंज कोण घेत बसतो, एकदमच सर्व गट्ट करून टाकले व भूक वाढली नाही म्हणून बापूसाहेबांपाशी तक्रार करून लागले. खरा प्रकार कळल्यावर 'तुझ्यासाठी औषध नाही' म्हणून बापूसाहेबांनी त्यांची पाठ थोपटली. त्यावेळी आपल्या अंगात एका घोड्याचे बळ असल्याचे ते सांगत. जाडा दोरखंड एका हिसक्यासरशी तोडणे, पाण्यानें भरलेल्या घागरी दोन्ही हातात दोन आणि दातात एक अशा धरून डेक्कन कॉलेजपासून घरी येणें, वानवडीपासून स्वाराच्या गेटापर्यंत लंष्करी सोजिराबरोबर धावण्याच्या शर्यती जिंकणें, या त्यांच्या त्यावेळच्या करमणुकी होत्या. एका इंग्रजी शिक्षकास टोपी उपडी करून ठेवण्याची सवय असे. एक दिवस यांनी तिच्यात अतिशय वस्त्रगाळ राख बेमालूमपणे भरून ठेवली. बोलण्याच्या भरांत साहेबांनी टोपी चटकन डोक्यावर ठेवली, त्यावेळी वर्गात हंशा पिकला तो काय सांगावा ! हल्लीच्या टिळक पंचांगाचे मूळ उत्पादक श्रीयुत केरू नाना छत्रे हे त्यावेळी त्यांचे शिक्षक होते. व त्यांचा अण्णासाहेबांवर अतिशय लोभ असे. ज्योतिर्गणिताचा अभ्यास यांनी त्यांच्याजवळच केला, स्वतःच्या वागण्यांत अण्णासाहेब पटवर्धन पंचांगाचा उपयोग करीत ते त्यामुळेच. एकदा स्वतःच्या उपयोगाकरिता म्हणून नानांनी चाळीस लाडवांचा एक डबा आणून भिंतीवर कोठे तरी ठेवून दिला होता. परंतु यांची त्याच्यावर नजर गेली. यांनी तो डबा खाली काढला आणि लाडू फस्त करून आंत धोंडे भरून ठेवले. नानांच्या ही गोष्ट लक्षांत आल्यावर त्यांनी मुकाट्याने सर्व विद्यार्थी एकत्र केले व एक जाड दोरखंड देऊन झटक्यासारशी हा कोण तोडतो म्हणून विचारले. कांही विद्यार्थ्यांनी झटापटी केल्यावर यांनी एका झटक्यात त्याचे दोन तुकडे करून पुढे ठेवले. तेव्हा तूच लाडू उडवलेस म्हणून नानांनी त्यांचा हात धरला. अशा अनेक गमती तेव्हा चालत असत. तेव्हा यांच्या डोक्यांत आय्.सी.एस. करिता इंग्लंडात जावयाचे होते. तेवढ्याकरिता अनेक भाषांचा अभ्यास त्यांनी सुरू केला होता. अरबी, फारशी, लॅटिन, ग्रीक, इत्यादि विदेशी व कानडी, तामिळ, तेलुगु इ. भारतीय भाषांतील त्यांचे ज्ञान त्यांच्या भाषणांत नेहमी उमटून पडे. डेक्कन कॉलेजमध्ये असल्या वेळेपासूनच रावसाहेब महादेव गोविंद

रानड्यांचे व त्यांचे निकट संबंध होते व त्यांच्याशी सहकार्य करून सामाजिक व राष्ट्रीय अशा अनेक चळवळींत त्यांनी भाग घेतला. परंतु पुढे तो संबंध फार काळ टिकला नाहीं. प्रत्येक बाबतीत रानड्यांचा कमालीचा मवाळपणा त्यांना पटणें शक्यच नव्हतें.

## सुधारक अण्णासाहेब

त्यावेळी पुण्यांत जोरांत असलेल्या विधवा पुनर्विवाहाच्या चळवळींतहि त्यांनी भाग घेतला होता. कांही विशेष परिस्थितींत विधवांचा पुनर्विवाह करणे अशास्त्रीय होणार नाही असे त्यांचें मत होतें. त्या चळवळीचे फार मोठे पुरस्कर्ते विष्णुशास्त्री पंडित म्हणून होते. त्यांच्या बरोबर कांहीं दिवस कार्य केल्यावर त्यांची अशी खात्री झाली की, कांहीं परिस्थींतीत तो क्षम्य असला तरी त्याच्या योगाने एक उच्च ध्येय नाहींसे होण्याचाच हल्लीच्या परिस्थितीत जास्त संभव असल्यामुळे तो न करणेंच बरें. पतितपरावर्तनाचाहि प्रश्न त्यांच्या डोक्यांत बराच घोळत होता. असें कांही तरी करून हिंदु व मुसलमान यांचे एकीकरण व्हावे असे त्यांस वाटे. परंतु अनुभवाने त्यांच्या असे लक्षात आले, की सुधारक म्हणविणाऱ्या लोकांचे हेतु कितीहि चांगले असले तरी ते पाश्चात्यांच्या वैभवानें दिपलेले, आर्य संस्कृति, आर्य परंपरा व आर्य राष्ट्र, यांच्या विषयींच्या कल्पना देखील पाश्चात्यांच्या दृष्टीतून घेणारे आणि तत्त्वतः कांही असले तरी प्रत्यक्षांत सुधारणा म्हणजे इंद्रियसुखाचा अनिबंध मार्ग असा अर्थ करणारे अशा वळणाचे होते. स्वतः ते आमचे राष्ट्रीयत्व पालटून मिळालेले स्वातंत्र्य, अथवा खाण्यापिण्याचे वा कपड्याचे मुर्दाड वैभव यःकश्चित् समजणारे असल्यामुळे लवकरच त्यांनी त्या चळवळींतून आपले अंग इतके काढून घेतले की, रानडे व विष्णुशास्त्री पंडित यांजबरोबर त्यांनी सुधारकी चळवळ केली हे कोणास खरे देखील वाटणार नाहीं. या त्यांच्या चळवळीचा परिणाम म्हणून घरांत त्यांच्यावर बहिष्कारहि पडला होता, परंतु त्यांनी आपली मतें व उद्योग सोडून दिले नाहींत, अथवा बेपर्वाईने वडिलांचा अपमान करून घरहि टाकून दिलें नाही. घरी यावें व बाजूस मांडलेल्या पानावर मुकाट्याने जाऊन आपल्या कामास निघून जावें, असा त्यांचा क्रम होता.

## मुंबईत बारा वर्षे

बी.ए. ची परीक्षा पास होऊन सन १८६७ त ते मुंबईस आले. तेथूनच त्यांच्या जीवनास खरा प्रारंभ झाला. मुंबईत त्यांचा मुक्काम मुरारजी गोकुळदास यांचे चाळींत सुमारे बारा वर्षे होता. तेथे अण्णासाहेब अतिशय श्रीमंती थाटाने राहात असत. स्वयंपाकी, पाणके, नोकरचाकर असल्यामुळे राहणी किती खर्चाची असेल हे सांगावयास नको. मुरारजी शेठ त्यावेळी जे.पी. होते. त्यांच्यामुळे सावकार लोकांत व व्यापारी मंडळींत त्यांचे वजन बसले. गुजराथेकडील अनेक लहान मोठ्या संस्थानांतील अनेक कार्यकर्त्या लोकांचा व त्यांचा संबंध आला, त्यांमुळे त्यांची बैठक म्हणजे एखाद्या फेरीवाल्यापासून एखाद्या लक्षाधीशापर्यंत सर्वांचाच

अड्डा होऊन बसला. पान-तंबाखू वगैरे गोष्टींचाहि आदर तेथे होत होता. वादविवाद, कोटिक्रम, थट्टामस्करी आणि टारगेपणा यांच्याबरोबरच तेथे विद्वत्तेचा पूर वाहात असे, परंतु त्यांत विशेष गोष्ट ही होती कीं, स्वत: ते कधींहि कोणत्याहि व्यसनाच्या आहारी गेले नाहींत.पुढे येईल त्यांत भाग घ्यावा म्हणजे अर्थातच धर्म व नीति त्यांच्या विरुद्ध नसल्यासारख्या गोष्टीत घटकाभर रमल्यासारखे व्हावे, सर्व गोष्टीस पुरे पडून ज्याच्या त्याच्या परी माणसाला जिव्हाळा लावून निरनिराळ्या तऱ्हेची कामे त्यांच्याकडून करवून घ्यावीत व पुन: एकमेकांचा एकमेकांस सुगावाहि नसावा, एवढी प्रचंड साक्षेपशक्ति व गांभीर्य त्यांच्या ठिकाणीं सहजच होते, त्यामुळे अमुक एक माहिती त्यांना आगाऊ मिळाली नाही अथवा अमुक एक काम करण्यास लायक माणूसच मिळाला नाहीं असे कधी झाले नाहीं. या मंडळींत बाजारबुणगेहि असावयाचेच पण त्यांतूनच निवडून काढून ते माणसें कामांस लावीत.

या साऱ्या उपद्व्यापामुळे अभ्यास तर काय पण त्यांना झोपेसहि वेळ सांपडत नसे. स्वत:च्या सुखसोयीविषयी ते अत्यंत उदासीन असत. प्रत्येक रविवारी, बरोबरच्या विद्यार्थ्यांस एखाद्या पक्वान्नाची मेजवानी असे. परंतु यांच्या स्वत:च्या पदरांत कधी पुरे जेवण पडले नाहीं अथवा अंथरुणाची गांठ पडली नाहीं. दोन दोन वाजेपर्यंत उठाठेवी करून तेथेच बैठकीवर लुडकावे अशी स्थिति होती. एकदा पुण्याहून येतांना जो बिछाना बांधून आणला तो सहा महिन्यांनी परत जातांना म्हणून झटकतांना त्यांत मोठे विंचू व गोमा निघाल्याचे अण्णासाहेब सांगत! अशा राहणीस, घरून केवढाहि पैसा आला तरी तो काय पुरा पडणार! त्यामुळे कर्जाच्या भानगडी नित्यच मागे लागलेल्या असत. पैसा मिळविण्याकरिता कोणाची अपिलें लिहिणें वगैरे उद्योगहि ते तेव्हांपासूनच करीत असत. मुंबईस गेले ते एल्‌एल्.बी. होण्याच्या इराद्याने परंतु तेथे गेल्यावर लवकरच असा योग आला की ते व त्यांचे स्नेही आबाजीपंत हे यावेळचे सुप्रसिद्ध डॉक्टर अण्णा मोरेश्वर कुंटे यांचेकडे उतरले होते. त्यावेळी मेडिकल कॉलेज ही पारशी लोकांची मिरास समजली जात असे. कुंट्यांसारख्या एखाद दुसऱ्या बामण तात्याचा तेथे उपहासच होत असे. एक दिवस कुंटे ह्या दोघांना घेऊन कॉलेज दाखविण्यास गेले. कॉलेज पाहणे झाल्यावर प्रिंसिपॉल डॉ. हंटर यांचा या दोघांशी त्यांनी परिचय करून दिला, तेव्हा कांहींहि विचार न करता मेडिकल कॉलेजमध्ये दाखल होण्यासाठी आले आहेत असे अण्णांनी ठोकून दिले. एकदा त्यांनी असें सांगितल्यावर माघार घेणे अण्णासाहेबांना शक्य नव्हते. अशा रीतीने एल्‌एल्.बी. व एल्.एम्. अँड एस्. अशी दोन्ही शिक्षणे एकदम सुरू झाली.

कोणतीहि गोष्ट अर्धवट करणें त्यांना पसंत नसल्यामुळे वैद्यकीचा अभ्यास शास्त्रदृष्ट्या पूर्ण व्हावा म्हणून त्यांनी महादेवशास्त्री लागवणकर यांजवळ आर्यवैद्यक शिकण्यास सुरुवात केली. मेडिकल कॉलेजांतील अभ्यासक्रमापेक्षा एल्‌एल्. बी. चा क्रम थोडा असल्यामुळे वास्तविक ते लवकरच वकील व्हावयाचे. परंतु परीक्षा पास होण्यास त्यांना आठ वर्षे लागली. याचें

कारण एक परीक्षक सुप्रसिद्ध विश्वनाथ नारायण मंडलिक ह्यांच्याशी त्यांचा झालेला तंटा. मंडलिकांच्या 'नेटिव्ह ओपीनिअन' मध्ये सरकारी धोरणावर कडक टीका करणारा अण्णासाहेब यांचा एक लेख छापवयाचे त्यांनी नाकारले त्यावरून काही बोलाचाली झाली. तेवढा दंश मनांत धरून परीक्षेत याचे उट्टे काढीन म्हणून मंडलिकांनी धाक घातला. त्यावर अण्णासाहेबांनीहि 'एलूएल्. बी. झालो तर तुमच्या हातूनच होईन, नाहीतर होणारच नाही '. असे त्यांना सांगितले. त्याप्रमाणे पांच वेळा मंडलिकांनी त्यांना नापास केले. सहाव्या वेळी आणीबाणीचा प्रसंग होता कारण मंडलिकांचे ते शेवटचें वर्ष होतें. मंडलिकांच्याहि वीरपणाची व प्रांजळपणाची धन्यच होय. अण्णासाहेबांस त्यांनी पास केले, इतकेच नाहीं तर ' तुझा पेपर असाच होता की पास केल्याशिवाय मला गत्यंतरच नव्हते.' असे बोलून शाबासकीहि दिली. अशा रीतीने ते एल्. एम्. एस्. व एलूएल्. बी. अशा दोन्ही परीक्षा पास झाले. परंतु त्या वेळच्या नियमाप्रमाणे त्यांना कोणती तरी एक पदवी घ्यावयाची होती. वडिलांच्या आज्ञेवरून त्यांनी वकील होण्याचे पत्करलें. 'ब्राह्मणाने वैद्यकीवर पैसा मिळवू नये, तेव्हा वकील व्हावे, ' ही वडिलांची आज्ञा त्यांनी आजन्म इतक्या कडकपणानें पाळली कीं वैद्यकीय सल्ल्याकरितां आलेल्या माणसाचें एखादे केळहि त्यांनी कधी घेतले नाहीं. मधल्या काळांत आपण एल्. सी. ई. च्या वर्गात जात होतो असेहि ते सांगत. या सर्व धडपडीच्या मुळाशीं महत्त्वाचें असें तात्कालीन असें सारें इंग्रजी शिक्षण घेऊन काही दृष्टीने ते हितकारक दिसले तरी एकंदर किती उथळ व फोल आहे हे सिद्ध करून दाखविण्याचा उद्देश होता. ते आत्मघातकी शिक्षण स्त्रियांच्या माथीं मारण्याच्या तर ते फार विरुद्ध होते. निरनिराळ्या अनुभवांवरून इंग्रजांविषयी त्यांनी एक सिद्धांत बांधला होता. इंग्रज मनुष्य कितीहि चांगला असो आणि वरून कसाहि वागो पोटांतून हिंदुस्थानाशीं असलेला त्याचा राजकीय संबंध, त्या संबंधाची त्यास व त्याच्या समाजास असलेली उपयुक्तता तो दृढ व दीर्घायु होण्याची आवश्यकता आणि त्या सर्वांसंबंधीं त्याचें कर्तव्य हें तो अजिबात कधी विसरू शकत नाहीं. याचा प्रतिसिद्धान्त असा होता कीं इंग्रज लोक जी गोष्ट उचलून घरीत त्यांत त्यांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष असें कांहीतरी राजकारण दिसून येई.

## वकिली व लेखन


एलूएल्. बी. ची पदवी घेतल्यावर मोठ्या थाटामाटाने ते मुंबईसच वकिली करूं लागले. या काळातच त्यांनी आपला सार्वजनिक व्यापहि वाढविला होता. एल्. सी.ई.ची परीक्षा त्यांनी दिलीच नाहीं. त्यांच्या सार्वजनिक उद्योगाची माहिती सांगण्यापूर्वी विद्यार्थिदशेंतील दोन तीन गोष्टी लक्षात ठेवण्याजोग्या सांगणे ठीक होईल. ' इंदुप्रकाश ' सारख्या वर्तमानपत्रांत ते तेव्हांपासून लिहीत. 'स्वातंत्र्याचा वृक्ष देशभक्ताच्या हृदयाच्या रक्तावर वाढतो.' या वाक्याने सुरू होणारा त्यांचा निबंध वाचून रावसाहेब रानड्यांस आनंदाचे

भरतें आल्याचें ते सांगत. मेडिकल कॉलेजमध्ये असतांना एका प्रोफेसराने एडिनबर्गच्या विद्यार्थिनींनीं चालविलेलें वैद्यकीय मासिक दाखवून 'तेथील विद्यार्थी कसे काम करतात तें पहा' अशी टीका केली. तेव्हां त्यास फजित करण्याकरितां श्री. अण्णासाहेब यांनी कंबर बांधली. त्या दिवशी सन १८७४ च्या मार्चची चार तारीख होती. कोणासहि न सांगता मुकाट्याने तयारी करून त्याच आकाराचा जाहिराती नसलेला परंतु तसलाच भरपूर मजकूर असलेला 'ग्रँट मेडिकल कॉलेज जर्नल' चा पहिला अंक त्यांनी चार एप्रिलला प्रोफेसरसाहेबांच्या हाती दिला. तेव्हा ते थक्कच होऊन गेले. या मासिकाची पुढें फार वाहवा झाली व त्याला जाहिराती वगैरे मिळू लागल्या. केम्प्स ॲण्ड को.च्या एजन्टाला अण्णासाहेब भेटावयास गेले तेव्हा तो खाना खावयास बसला होता. तेव्हा काळा आदमी म्हणून त्याने अण्णासाहेबांस दूर उभें राहावयास सांगितले. त्यासरशी *Good day* म्हणून पाठ फिरविली. चार महिन्यांनी तोच एजन्ट अण्णासाहेबांकडे येऊन अजीजी करूं लागला की आमच्या जाहिराती घ्या.

## मनस्वीपणा

एकदा एका प्रसिद्ध गाणारणीच्या गाण्याचा समारंभ कांही मंडळींनी घडवून आणला होता. पूर्वी ठरल्याप्रमाणें विश्रांतीकरितां ती स्वस्थ बसली असता कोणी चहाच्या निमित्ताने, कोणी विडीच्या निमित्ताने असे एक एक जण निघून गेले. अण्णासाहेब व ती बाई असे दोघेच तेथें राहिले. ते पाहून अण्णासाहेबहि जावयास निघाले. पाहतात तो दारास बाहेरून कडी. मंडळींचा डाव त्यांच्या लक्षात आला. मोहास बळी पडण्याची त्यांना भीति नव्हती. परंतु आपल्या पवित्र शरीरास एखादा घाणेरडा स्पर्श व्हावा हे त्यांना सहन होईना, परंतु तसें काही न दर्शविता सहजगत्या ते गच्चीवर गेले आणि कांहीहि विचार न करता त्यांनी एकदम खाली उडी टाकली. माडी पुष्कळच उंच होती. परंतु सुदैवाने रस्त्यावरील दुकानदाराच्या पालावर उडी पडून काही अपघात न होता प्रसंग निभावला. हा त्यांचा स्वभाव लहानमोठ्या अनेक गोष्टींत उमटून पडत असे. तमाखूचें वेड फार होते. सुमारे अदपाव तमाखू व शेदीडशे पानें रोज त्यांना लागत. एकदा असा योग आला की बोलण्याचे भरात भान न राहून तमाखूची थुंकी त्यांनी बाहेर टाकली. कॉलेजातील एक प्रोफेसर त्याचवेळी खालून चालले होते. त्यांनाच हा प्रसाद मिळाला. प्रोफेसर साहेबांनी रागाने मान वर केली परंतु यांना पाहताच थोडे हंसून रस्ता सुधारला. या गोष्टीची अण्णासाहेबांस एवढी लाज वाटली की त्यांनी लागलीच एका ब्राह्मणास बोलावून चांदीच्या सर्व उंची संचासह ती पानतंबाखू त्याच्या पदरात टाकली. तेव्हापासून आमरणान्त आपण पुन्हा कधी तिला शिवले नाहीत. असाच त्यांचा मनस्वीपणा प्रत्येक गोष्टीत असे. इतक्या उठाठेवींतून अभ्यास व्हावयाचा. कोठे रस्त्याने जातांना, दुसऱ्याशीं बोलतांना, नाहीं तर अपरात्री खोलींत फेऱ्या घालीत,

॥ श्रीः ॥



श्रीसद्‌गुरु नरसिंव्ह सरस्वती महाराज
(आळंदी)

कोनाड्यांतून ठेवलेल्या पक्वान्नाचे तुकडे तोंडात टाकता टाकता व्हावयाचा. एकदा तर पुरे बहात्तर तास बैठक न मोडता ते वाचीत बसले होते. त्यावेळचा अनुभव तेच नेहमी सांगत असत. राजे दिनकरराव राजवाडे मुंबईस येऊन आंग्र्यांच्या वाडींत उतरले होते. अंगांत नुसता सदरा, डोक्यास बदामी रंगाचा फेटा आणि हातांत एक सोटा अशा तालीमबाजी थाटानें अण्णासाहेब त्यांच्याकडे गेले. परवानगीची वगैरे काही वाट न पाहता सरळ वर जाऊन त्यांच्यासमोर ठाण मांडून बसले. कुणीकडे आला म्हणून चौकशी केली असता वडिलांची ओळख न देता एक विद्यार्थी आहे व आपल्यासारख्या महापुरुषांस पाहावे म्हणून आलो आहे असे सांगितले. हे दिनकरराव म्हणजे *"If Shindia joining I shall have Pack Off "* म्हणजे शिंदे बंडवाल्याला मिळाले तर आपल्याला गाशा गुंडाळावा लागेल.अशी ज्या वेळेस कॅनिंगनें विलायतेस तार केली त्याच वेळेस जयाजीराव शिंद्यांना इंग्रजांच्या स्वाधीन करून पारतंत्र्याची बेडी भारताच्या पायांत पक्की अडकविणारे प्रसिद्ध पुरुष होते. अण्णासाहेबांनी त्यांना सांगितले, 'राष्ट्राला विपन्न स्थितींत टाकून आपल्याच हाताने आपलें गळे कांपणारा आणि अनंत पिढ्यांचा तळतळाट घेणारा पुरुष तरी कसा असतो ते पाहावें.' असे म्हटले. त्यावर पुष्कळ बोलणे होऊन 'आपला मूर्खपणा झाला, काय बुद्धि तेव्हां झाली कांहीं कळत नाही.' असे त्यांनी कबूल केले. 'सरकारांत आपले चांगले वजन आहे, एखादा प्रसंग आला तर अजून तरी इमानास जागा' असे अण्णासाहेबांनी त्यांना सांगितले. या भेटीचा पुढे मल्हारराव गायकवाडाचे प्रकरणीं मोठाच उपयोग झाला.

## केसरी व मराठा

मुंबईतील वास्तव्यांत त्यांनी जे अनेक उद्योग केले त्यांचे साधारण दोन वर्ग पडतात. एक शुद्ध राजकीय भानगडी व दुसरा निरनिराळ्या तऱ्हेच्या चळवळी. लोकमान्य टिळकांचे परमस्नेही म्हणून प्रसिद्ध असलेल्या माधवराव नामजोश्यांना हाताशी घेऊन त्यांनी 'किरण' नावाचे मराठी व Deccan Star नावाचे इंग्रजी पत्र पुण्यास काढले. याच पत्रांचे पुढे 'केसरी' व 'मराठा' यांत रूपांतर करण्यांत आले. आंग्लवैद्यक व आर्यवैद्यक यांची योग्यता प्रत्यक्ष प्रयोगावरून ठरविण्याकरितां त्यांनी एक इंग्लिश दवाखाना व एक देशी दवाखाना सुरू केला. देशी दवाखाना सुप्रसिद्ध लागवणकर शास्त्री चालवीत असत. इंग्रजी दवाखाना डॉ. भाऊ गोपाळ मंत्री नांवाचें एक सारस्वत गृहस्थ चालवीत. वैद्यसुधा नांवाचें एक मासिकहि त्यांनी मंडळींना हाताशीं घेऊन चालविलें होते. औद्योगिक चळवळ म्हणून त्यांनी पुढाकार घेतलेला एक कांच कारखाना एका स्वीडिश माणसाच्या देखरेखीखाली इतका भरभराटला होता की इंग्रजी व्यापाऱ्यांनी मिठावरील कराचा कायदा करविला, त्यामुळे सल्फ्युरिक ॲसिड वगैरे जे पदार्थ त्यांना पूर्वी फार थोड्या खर्चात करतां येत होते ते तसे करता येईनात. कांच माफक किंमतीत देणे परवडेना म्हणून हा कारखाना बंद करावा लागला.

वकिली करूं लागल्यावर, डॉक्टर, वैद्य, वकील, एक श्रीमंत गृहस्थ,एक पुढारी, एक चळवळ्या इत्यादि निरनिराळ्या रीतींनी त्यांचा अनेक लहानमोठ्या माणसांशी संबंध आला. त्या वेळेला मुंबईस रशियन प्रिन्स आला होता. तेव्हा रशियन भाषेच्या तात्पुरत्या कां होईना पण जाणतेपणामुळे अण्णासाहेबांना पुढे केले होते. या गोष्टीचा फायदा घेऊन लष्करी जहाज कसे असते ते पाहण्याकरिता ते स्वतः त्याच्या जहाजावर गेले होते. टॉरपेडो बॉम्बशेल्स यांच्या प्राथमिक अवस्था आपण तेथे पाहिल्याचे ते सांगत. श्रीमंत दादासाहेब खापर्डे, लोकमान्य टिळक इत्यादिकांचे संबंध याच काळांत आले, व ते आमरणान्त तसेच दृढ राहिले. ५७ च्या बंडांत भाग घेणारे लहानमोठे कित्येक गृहस्थ मुंबईत निरनिराळ्या सोंगांनी राहात. त्यांचे व अण्णासाहेबांचे संबंध असतच. इंदूरचे सुप्रसिद्ध तुकोजीराव होळकर यांचा परिचय याच काळांत झाला. त्यांच्या स्नेही मंडळींत घरंदाज मुसलमानहि होते. पेरुअय्यासारखा साधा भोळा तेलंगा ब्राह्मणहि त्यांच्या आश्रयास होता. गायनाची गोडी व गायन शास्त्रांचा अभ्यास याच आश्रितामुळे त्यांना घडला. सन्निपाताच्या रोग्यास झोंप मुळीच येत नाहीं. पेरुअय्याच्या गायनाने अशा रोग्यांना झोप आणून त्यांना बरे केल्याचे ते सांगत. गणपतराव सहस्रबुद्धे म्हणून त्यांच्याकडे स्वयंपाकीपेशाने राहिलेला मनुष्य ब्रह्मावर्तास पेशव्यांच्या परिवारात होता व कानपूर, ग्वाल्हेर इत्यादि युद्धांत त्याने तलवारहि गाजविली होती. अशा सर्व लोकांस एकत्र करून इंग्रजांशी पुनः जंग करण्याची हिंमत वासुदेव बळवंताने धरली होती. वासुदेव बळवंताचा व अण्णासाहेबांचा निकट संबंध होता. त्याचप्रमाणे रावसाहेब रानडे यांचाहि होता.

## रानडे व अण्णासाहेब

रावसाहेब रानडे व अण्णासाहेब यांचा पहिल्यापासूनच कांहीं बाबतींत फार मोठा विरोध होता. रावसाहेब रानडे व त्या वेळचे इतर सुधारक पुढारी यांच्या हेतूविषयी अण्णासाहेबांचा कधी वाईट ग्रह नव्हता. परंतु सुधारणा व प्रगति यांच्या *(Inferiority complex)* नांवाखाली त्यांच्या सर्व विचाराच्या मुळाशी एक प्रकारचा न्यूनगंड त्यांच्या प्रतीतीस येई. मूठभर इंग्रजांनी आपल्याला जिंकले तेव्हा आपले कुठेतरी चुकले असले पाहिजे. आणि कांहीं बाबतींत आपण त्यांच्या मागे असलो पाहिजे हीहि गोष्ट त्यांना पटत असे. या बाबीसंबंधी सुधारकांचे व त्यांचे एकमत नसले तरी आपल्या चुका सुधारण्याकरिता होणाऱ्या चळवळीत, सुधारकांची चळवळ हीहि एक येऊ शकते परंतु अनुभवानें त्याची अशी खात्री झाली होती की, इंग्रजांच्या दडपणात आपली खरी सुधारणा होणे शक्य नाही. झाडाखाली झाड वाढत नाही. प्रजेच्या प्रकृतीतले सूक्ष्म ज्ञान करून घेणाऱ्या व स्वतःची राजनीति यत्किंचित् हयगय न करिता अथवा कोणत्याहि विकारांना वश न होता डोळ्यांत तेल घालून पाळणाऱ्या इंग्रजांस, डाव खेळून फसविणे शक्य नाहीं अशी त्यांची खात्री होती. सामाजिक

उन्नतीने आपण इंग्रजांच्या बरोबरीचे झालो म्हणजे ते आपले राज्य देऊन टाकतील ही सुधारकी कल्पना त्यांना हास्यास्पद व भित्रेपणाची वाटे. म्हणून त्यांचे लक्ष शुद्ध राजकीय खटाटोपाकडे लागले. आधी स्वातंत्र्य मिळवून देणारी राजकीय चळवळ, व तिच्या आनुषंगाने बाकीच्या असा त्यांचा आराखडा होता. त्यांचा मुख्य भर जेणे करून कांहींतरी परराष्ट्रीय गोंधळ हिंदी राजकारणांत घालता येईल व जेणेकरून, एखाद्या परकीराष्ट्राला हिंदुस्थानच्या अंतर्गत व्यवस्थेंत लुडबूड करतां येईल. परंतु त्याचा फायदा मात्र हिंदुस्थानला करतां येईल असे कांहींतरी करण्यावर होता. हिंदुस्थान सरकार व त्यांचे एतद्देशीय दोस्त, जी मांडलिक संस्थाने त्यांच्या परस्परसंबंधाचे व राजकारणी इतिहासाचे जे सूक्ष्म व गाढ ज्ञान त्यांनी संपादिले ते एवढ्याकरिता. जंजिरा, सांगली इत्यादि कित्येक संस्थानिकांची कामें त्यांच्या हातून अपेक्षेच्या बाहेर चांगली झाली ती यामुळेच. या सर्वांचा परिणाम असा झाला की, कांहींतरी युक्तिप्रयुक्तीनें एखादे संस्थानच स्वतःकडे वहिवाटीला घेतले पाहिजे असे त्यांनीं ठरविलें. पुढील सात आठ वर्षे त्यांची याच कल्पनेत गेली.

स्वाभिमानाची ज्योत महाराष्ट्रांत कधींच विझली नाहीं. सुशिक्षित असो अशिक्षित असो, सर्वांनाच स्वातंत्र्य परत मिळालें पाहिजे अशी तहान होती. ओंकारेश्वराजवळ राहणारे सरदार तात्यासाहेब रायरीकर हे अशाच मंडळींपैकी एक प्रमुख होते. तात्यासाहेब हे अण्णासाहेबांचे राजकारणांतील आद्यगुरु आणि रावसाहेब रानडे, सार्वजनिक काका हे त्यांचे सहकारी होते. या लोकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक सभेशी त्यांचा अखेरपर्यंत घनिष्ठ संबंध होता. बाळासाहेब नातूंचा व त्यांचा दृढ स्नेह होता. असेहि असून बाळासाहेबांच्या येथे कधी पाण्याचा घोटहि घेतला नाही. कारण इंग्रजांचा झेंडा शनिवारवाड्यावर त्यांच्या पूर्वजाने उभारला होता. निरनिराळ्या चळवळी यांच्याबरोबर ते करीत परंतु त्यांचा मुख्य भर कांहीं तरी प्रत्यक्ष राज्यकारभार करण्यावर होता.

## राजकारणाची मूळ कल्पना

त्यांची मूळ कल्पना स्वामी विवेकानंदांप्रमाणेच दिसते. विवेकानंदांस वाटत असें कीं, पाश्चात्त्य राष्ट्रांस वेदांत सांगून आपण दोन कोट पौंड सहज जमवू आणि एकदा ते हाती आले म्हणजे हिंदुस्थानचे सारे गाडे पाहिजे तशा वळणावर बसवू. हे पौंड त्यांच्या हाती कधीच आले नाहीत आणि पुढे या बाबतींत ईश्वरीसूत्र कांहीं निराळेंच असल्याची त्यांना प्रतीति आली. इंग्रजांच्या स्वभावाचे आणि जागतिक राजकारणाचे अण्णासाहेब यांचे ज्ञान इतके सूक्ष्म होते की पाश्चात्त्यांना दिपवून पैसे मिळवता येतील असा भ्रम त्यांना मुळीच नव्हता. परंतु संस्थानी कारभारांत गडबडा करून इंग्रजांना शह देतां येईल असे त्यांना वाटत होते. त्याकरिता त्यांनी जे अनेक प्रयत्न केले त्यांतील सर्वात मोठे वऱ्हाड आणि मद्रासेकडील करवटनगर यासंबंधीचे होत. संस्थानिकांच्या पदरी इंग्रजी फौज ठेवून त्याच्या रक्षणाचा

भार आपण उचलावयाचा आणि त्याच्या बदल्यांत फौजेचा खर्च म्हणून त्याचा मुलूख आपल्याकडे घ्यावयाचा असे राजनैतिक धोरण मार्क्विस वेलस्लीने सुरू केल्यापासून हळूहळू सारे संस्थानिक त्याला बळी पडले होते. इंग्रजी फौजेचे विशाल हत्ती पोसतां पोसतां संस्थानिकांच्या नाकी नव येत. त्यामुळे सारेच संस्थानिक नेहमी कर्जांत बुडालेले असता या कर्जाची फेडहि त्यांना इंग्रजांच्या सल्ल्यानेच करावी लागे. कारण दुसरा एवढा मोठा सहाय्यक मिळणार तरी कोण? इंग्रजांच्याऐवजी एखाद्या परकीय राष्ट्राच्या साह्याने संस्थानिकाला कर्ज देऊन त्याचा मुलूख आपल्याकडे प्रत्यक्ष वहिवाटीला घेतला तर आपले उद्दिष्ट साधेल असे अण्णासाहेबांना वाटे.

असे वाटें म्हणजे तेथें बंडाचा कांहीं गोंधळ घालावा अशी त्यांची कल्पना कधींच नव्हती. तात्यासाहेब रायरीकर यांनी तात्कालीन कल्पनेप्रमाणे तपश्चर्या करून बंडांत भाग घेण्याकरिता ते जात असतां पकडल्या गेलेले त्यांनी पाहिले होते. सुप्रसिद्ध वासुदेव बळवंत फडके यांच्याशी त्यांचा पहिल्यापासून संबंध होता. इंग्रजांची सारी ऐट आपलें राज्य कायद्याप्रमाणे प्रस्थापित झाले आहे व ते कायद्याप्रमाणे चालते अशी होती. मनुष्याची ऐट म्हणजे त्याचा दुर्बळपणाच. या दुर्बळपणाचा जर फायदा घेता आला तर इंग्रजाला वाकवता येईल, ही त्यांची मूळ कल्पना. या कल्पनेचाच परिपोष पुढे लो. टिळकांनी व गांधीजींनी निरनिराळ्या रीतीनें केला. अण्णासाहेब यांची कल्पना जर्मनीच्या हिटलरसारखी होती. आपल्या संपूर्ण सत्तेखाली असलेल्या एखाद्या प्रांतातील जनता पुढें जर्मनीत उत्पन्न झालेल्या नाझींच्याप्रमाणे आपल्या कल्पनेप्रमाणें तयार करावयाची. आणि तें मुख्य केंद्र करून सारा हिंदुस्थान हालवावयाचा अशी ती कल्पना होती. त्यावेळेला पोषक अशी एक घटनाहि घडून येत होती.

## वऱ्हाड प्रकरण

वऱ्हाडचा सुपीक व सधन प्रांत हा निझामाकडेच होता. 'वऱ्हाड म्हणजे सोन्याची कऱ्हाड' अशी म्हणच होती. कर्जफेडीच्या निमित्तानें वऱ्हाड फार दिवस इंग्रजांकडे वहिवाटीला होते व कर्झनसाहेबानें पुढे ते जसें संपूर्ण घशांत टाकलें तसाच त्यावेळी इंग्रजांचा बेत दिसत होता. बंडाच्या वेळीं व त्यानंतरहि १३-१४ वर्षें असलेला हैद्राबादचा दिवाण सर सालरजंग हा त्यावेळच्या साडेतीन शहाण्यापैकी एक समजला जात असे. इंग्रजांचें कर्ज जर कोणीकडून तरी स्वतंत्रपणे फेडता आले तर वऱ्हाडची सुटका होणार होती. या सुमारें बारा कोटी कर्जाकरिता अनेक मोठमोठ्या धनिकांशीं त्यांचें बोलणें सुरू होते. अण्णासाहेबांचे हस्तक भिकाजीपंत देशपांडे व भाऊ निऊळकर हेहि हैद्राबादेस होतेच. या कर्जाची मुख्य अट ही होती की इंग्रजांच्या हमीशिवाय (Without Security)तें पाहिजे होतें. या कर्जापेक्षा मोठी रक्कम देण्यास अनेक लोक तयार होते परंतु इंग्रजांच्या मध्यस्थीशिवाय ती मिळणार नव्हती. आमचा मालक इंग्रजांच्या मध्यस्थीशिवाय इतके कर्ज सहज देऊ शकेल असे भिकाजीपंतानं

छातीठोकपणें सांगितले. तेव्हां हा मनुष्य तरी कोण आहे तें एकदां पाहावें म्हणून पूर्वसूचना न देतां सालरजंगानें भिकाजी रुस्तुम या पारशी गृहस्थांस एकदम मुंबईस पाठविले. परंतु त्यापूर्वी दुसऱ्या कांही कामाकरितां चार तासांच्या आंत दोन कोटी रुपये पाहिजेत, मालकांना तार करा असें भिकाजीपंतास सांगितले व तारेचे उत्तर येईपर्यंत वाड्यांतच बसवून ठेवलें. अण्णासाहेब यांस तार मिळताच मेडिकल कॉलेजमधले त्यांचे एक शिक्षक व नंतरचे स्नेही डॉ. स्मिथ यांच्यामार्फत फ्रेंच बँकेकडून त्यांनी तें कर्ज घेतलें व तशी तार केली. परंतु आता आपलें काम झालें असें म्हणून सालरजंगाने ते परत केलें. चार तासांचा खेळ झाला, परंतु बँकेचें व्याज, डॉ. स्मिथची दलाली मिळून अण्णासाहेब दोनचार लाखांच्या कर्जांत आले. हें कर्ज त्यांना अखेरपर्यंत फेडावे लागले.

भिकाजी रुस्तुम अचानक आला तरी देखील त्याचा सुगावा लागून तेवढ्यांतल्या तेवढ्यांत अण्णासाहेबांनी त्याचें इतके उत्तम स्वागत केलें की तो बेहद्द खूश झाला व सालरजंगानें दिलेलें स्वदस्तुरचें फारशी पत्र त्यानें अण्णासाहेबांना दिले. पुढें बोलणें चालणें होऊन असें ठरलें की अण्णासाहेब लवकरच दुसऱ्या एका कामाकरितां मद्रासेस जाणार होते तेव्हां गाणगापूर स्टेशनवर सालरजंगानें त्यांना भेटावे व एकमेकांचे प्रत्यक्ष बोलणें होऊन सर्व गोष्टींना निश्चित स्वरूप द्यावे.

## करवटनगर व मद्रास

मद्रास प्रांतात करवटनगर म्हणून सालिना सुमारे ६० लक्ष उत्पन्नाचे एक संस्थान होते. तेथील राजा व्यंकटपरमाळ हा मोठा सुस्वभावी असून अशाच प्रकारच्या कांही विवंचनेंत होता.सालरजंगाला व व्यंकटपरमाळला पैसे पुरवून इंग्रजांच्या ऋणांतून मोकळें करावे, व त्याच्या बदल्यात वऱ्हाड व करवटनगर पूर्णपणें आपल्या वहिवाटीला घ्यावे अशी योजना होती व तिच्याकरितां व्यंकटपरमाळला भेटण्याकरितां अण्णासाहेब स्वतः ता. १२ ऑक्टोबर १८८० या दिवशी मद्रास मेलने निघाले. परंतु ठरलेल्या योजनेप्रमाणें सालरजंग गाणगापुरास येऊ शकला नाही. लवकरच पुढें तो कॉलऱ्यानें वारल्याची तार आली. वऱ्हाडचा हा एवढा व्यूह सिद्धीला जाणार हे खपेना आणि कायदेशीर रीतीने तर तो थांबविण्याला कांही मार्ग नव्हता. हे पाहून आपल्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे इंग्रजांनी सालरजंगाला विषप्रयोग केला असे अण्णासाहेब सांगत असत. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी हैद्राबादच्या एका मुसलमान गृहस्थाने लिहीलेल्या सालरजंगच्या चरित्रांत हा सारा इतिहास दिसला नसला तरी सालरजंगाला विषप्रयोग झाला असेच लिहिले आहे. वऱ्हाडच्या कारस्थानची माहिती तोपर्यंत अण्णासाहेब व सालरजंग यांच्याखेरीज कोणास माहीत नव्हती. तेव्हा ती गुप्त गोष्ट प्रकट न होणे साहजिक आहे. वऱ्हाडच्या बाबतींत इंग्रजांनी काय काय पापे केली त्याची साधार माहिती लंडनला त्यावेळेस स्टेट्समन म्हणून एक मासिक निघत असें त्यांत आली होती व तेवढ्याकरितां मासिकाचा संपादक किंग म्हणून कोणी होता त्याला कारागृहवासहि भोगावा

लागला होता.

एक लहान संस्थान झाले म्हणून काय झालें, तें पूर्णपणें एखाद्या हिंदी मनुष्याच्या अधिकारांत असावें, हे इंग्रजास कसें खपेल ? तेव्हां तेथेंहि अण्णासाहेबांस विरोध सुरू झाला. सर्व कांही ठीक जमलें होते पण राजपुत्राच्या सहीवाचून अडलें. त्यांचा शिक्षक (Tutor) असलेला इंग्रज गृहस्थ त्याला सही करू देईना. या कामाकरिता सुमारें साडेतीन वर्षे अण्णासाहेब मद्रासेस अडकून पडले होते. तेथें असतांना ते मद्रासजवळ तिरुपूर म्हणून एक छोटें गांव आहे, तेथें राहात. हा काळ त्यांच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाचा होता. राजपुत्राची सही अडवून धरण्याखेरीज इतर रीतीनीहि त्यांना त्रास देण्यांत आला. शौचास गेले असतां गोळी घालून मारण्याचा प्रयत्न करण्यांत आला पण सुदैवाने ती केंसात चाटून गेली. आगगाडीखाली एक वासरू मरणार असे पाहून अण्णासाहेबांनी तारेवरून ताडदिशी उडी मारली आणि वासरास उचलून पलीकडे उडाले. डोळ्याचे पात लवण्याइतकाच अवधि नाहींतर दोघेहि दगावलेच असते. या गोष्टीचें कौतुक करण्याऐवजीं प्रतिपक्षाच्या गार्डनें त्यांच्यावर ड्रेसपासची फिर्याद केली. अशा अनेक कटकटी होतां होतां अखेरीस राजपुत्राच्या सहीचा प्रश्न सुटला. शिक्षकाचा मुलगा आजारी पडून अत्यवस्थ झाला तेव्हां नाक मुठींत धरुन ते अण्णासाहेबांकडे आले. तेव्हा मुलगा बरा झाला व त्याची सहीहि मिळाली. परंतु काय झालें कोण जाणें व्यंकटपरमाळहि एकाएकीं मृत्युमुखीं पडला आणि सर्वच कारस्थाने कोलमडून पडली.

## गंडांतर

मद्रासेस असता त्यांच्या जीवावर आलेल्या संकटांपैकी दोन अतिशय मोठी म्हणजे शौचास गेले असता एका काळ्या भोर छोट्या नागाने त्यांना गाठले. भीती ही त्यांना कधी ठाऊकच नव्हती. त्यांच्या नजरेला नजर भिडवून सुमारे दहा मिनिटे हे उभे राहिल्यावर तो निघून गेला. परंतु तोपर्यंत त्यांच्या रक्ताचे पाणी पाणी होत होते. ते गंगाळ पुढे घेऊन सारखी लाळ गाळीत बसले होते. शौचावाटे रक्त पडण्याची सवय त्यांना लहानपणापासूनच होती. परंतु मद्रासच्या मुक्कामांत अठ्ठावीस महिने एकसारखे रक्त पडत होते. त्याचा परिणाम म्हणून शेवटी त्यांस घटसर्प झाला. त्यांच्या लक्षात आले परंतु मंडळीने घाबरू नये म्हणून ते उगीच पाणी प्याल्याचें सोंग करीत व कोणी नाहीं असे पाहून थुंकून टाकीत. नवव्या दिवशी त्यांची अवस्था फार कठीण झाली. घशाची सूज वाढत होती व नाना प्रकारचे क्लेश होत होते. तरी ते बाजेवर मांडी घालून स्वस्थपणे नामस्मरण करीत प्राणोत्क्रमणाची वाट पाहात होते.

## कंचीस्वामी

इतक्यांत कंचीचे रामचंद्र अय्या तेथे अकस्मात् येऊन पोचले. रामचंद्र अय्या हे त्या प्रांतांतले फार मोठे सत्पुरुष होते. ते नित्य एक लाख नामस्मरण करीत असत. एक लुंगी व

पाठीवर एक पंचा हा त्यांचा पोशाख. वरदराजी कानगी गोळा करण्याकरिता नित्य हिंडत राहावयाचे हा त्यांचा व्यवसाय. त्यांचा अधिकार फार मोठा होता. नामदेवाशीं ज्याप्रमाणे पांडुरंग त्याचप्रमाणें श्रीवरदराज त्यांच्याशीं खेळीमेळीने राहात असत. आल्याबरोबर त्यांनी घाबरू नकोस मी आलो आहे असे सांगितले. त्यांचा चेहरा संतापाने लाल झाला, डोक्यावरील केस कांट्यासारखे उभे राहिले. अंगणात जाऊन ' वरदंडा' म्हणून देवास एक शिवी हांसडली व यांच्या केसास धक्का लागला तर मी जीभ हासडून प्राण देईन म्हणून बजावले. त्यासरशी एकदम आराम पडून यंत्रात यंत्रे बसविल्याप्रमाणे शरीरांत सर्व व्यवस्था ठीक झाली व श्वास सुरळीत चालू झाला. हळूहळू ते बरे झाले. तरीपण दुखण्याचा परिणाम सहासात वर्षे एवढा राहिला की बेसावधपणे नुसते पाणी अंगावर पडले तरी सारा प्राण गोळा होत व कठीण अवस्था होई. अशाच स्थितींत सहासात वर्षे जवळजवळ एकांतांत काढल्यावर हळूहळू ते समाजांत वावरू लागले. एखादा ट्रान्सफर सीन व्हावा त्याप्रमाणे त्यांच्यात जे स्थित्यंतर झाले त्याचे हेहि एक मोठें कारण होते.

## धार्मिक बाजू

मुळांतच त्यांचा स्वभाव श्रद्धाळू होता. स्वधर्मावर व स्वसंस्कृतीवर त्यांची निःस्सीम श्रद्धा होती. त्या काळाला अनुसरून ईश्वरसत्ता, ईश्वरी सामर्थ्य आणि तप, उपासना या सर्व गोष्टींवर त्यांचा अढळ विश्वास होता. त्यांच्या अस्तित्वाचे त्यांना प्रत्यक्ष फार मोठे पुरावेहि मिळाले होते. मद्रासच्या मुक्कामांत मंत्रसामर्थ्याच्या किमयेचे आणि अशाच अनेक गोष्टींचे अनुभव आल्याचे ते सांगत होते, स्वराज्य साधनेचा व्याप करीत असतांना ईश्वरी सामर्थ्याची जोड त्याला देण्याकरिता अनेक प्रकारे त्यांची धडपड चालू असे. तेवढ्याकरितांच त्यांनीं पेशव्यांचे कुलोपाध्याय तात्यासाहेब कर्वे यांच्याकडून श्री गजाननाची उपासना घेतली. तात्यासाहेब रायरीकरांच्या मार्फत आळंदीचे श्री नरसिंह सरस्वती स्वामींशी त्यांचा संबंध आला. हे स्वामी सन १८७३ साली आळंदीस राहण्यास आले. हे कोण, कोठून आले इत्यादि सर्व इतिहास अज्ञात आहे. श्री. अण्णासाहेब त्यांना प्रत्यक्ष दत्तच समजत. हंडाभर दूध हजारो माणसास पुरविणे, कागदाच्या लहानशा भोकांतून बसल्याजागी काबूलची लढाई दाखविणे इत्यादि स्वामींच्या दैवी सामर्थ्याच्या त्यांना अनेक प्रतीति आल्या होत्या. उत्तरोत्तर स्वामींवरची त्यांची निष्ठा वाढत गेली. या स्वामींचा पुढे त्यांच्यावर एवढा परिणाम झाला की हळूहळू ते तद्रूप होऊन गेले, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

## स्थित्यंतर

या स्वामींनी त्यांच्या लक्षांत आणून दिलें की हिंदुस्थानची उन्नति पैशावाचून अडलेली आहे. माणसांच्या वाचून अडलेली नाही. आणि ही माणसें नुसत्या पैशाच्या साह्याने चळवळी करून उत्पन्न होणार नाहीत. त्याकरिता ईश्वरी क्षेत्रांत कर्म केले पाहिजे. आणि तसे कर्म करता येते. अण्णासाहेब असे सांगत की अर्जुनास ज्याप्रमाणे श्रीकृष्णाने पुढील

घटना प्रत्यक्ष दाखविली त्याप्रमाणेच महाराजांनी - श्री नरसिंहस्वामींस ते महाराज म्हणत - पुढील सर्व मांडणी आपणास दाखविली. त्यामुळेच कर्तव्याचा खरा बोध होऊन कशाचीहि पर्वा न करता ते आपल्या मार्गास लागले. त्यांच्या आयुष्यात जो एकदम पालट झालेला दिसतो त्याचें खरें कारण हें आहे. पुढेहि व्यवहार केलेच प ण ते केवळ साक्षित्वाने. त्यांना प्रोत्साहन देण्यापुरतेच. त्यांचा मुख्य भर ईश्वरी क्षेत्रांत काम करण्यावर होता व सतत छत्तीस वर्षेपर्यंत आहार व निद्रा यांची देखील पर्वा न करता त्यांनी परिश्रम केले. श्री. विवेकानंदांनी आपल्या कर्मयोगांत असे म्हटले आहे की एखाद्या मनुष्याने स्वत:ला गुहेत कोंडून घेऊन आजन्म पांच चांगल्या विचारांचे एकसारखे चिंतन केले तर लवकरच असा काळ येईल की ते विचार पर्वताची दुर्गम शिलाखंडे फोडून जगभर पसरतील व साऱ्या जगाला हलवून सोडतील. अशासारखी त्यांची कल्पना होती. आपल्या टीचभर बुद्धीने पुस्तकी पांडित्याच्या जोरावर जीवनाचा प्रश्न सोडवू पाहणाऱ्यांनी वाटल्यास त्यांना पराजित वृत्तीचे म्हणावे. त्यांच्या सहवासांतला कोणीहि मनुष्य तसे समजणे शक्य नव्हते. देशकार्याकरिता बळी गेलेल्या चाफेकर बंधूंचें तर्पण अखरेपर्यंत ते स्वत: करीत. ही एकच गोष्ट केवढा तरी प्रकाश पाडणारी आहे. साधनात योग्य तो बदल झाला असला तरी वर सांगितल्याप्रमाणे मद्रासहून परत आल्यानंतर सुमारे सात आठ वर्षांचा काळ प्रकृतीच्या नाजूकपणामुळे यांचा जवळ जवळ मौन व एकांतावस्थेत गेला. परंतु हळूहळू त्यांच्यामागे पुन: बाहेरचे व्याप लागले. फळाने लदबदलेल्या आंब्यास ज्याप्रमाणे मुले सारखी दगड मारीत राहतात त्याप्रमाणे अनेक प्रकारच्या सद्गुणसंपत्तीने युक्त असून कोणापासूनहि कशाची अपेक्षा न ठेवणाऱ्या व्यक्तीस या नाही त्या निमित्तानें लोक त्रास देत राहणारच. वैद्यकीवर ते पैसा मिळवीत नव्हते व कोणासहि वैद्यकीय सल्ला द्यावयास तयार असत. त्यामुळे तो व्याप त्यांच्यामागे पुष्कळच होता. गुरुवार व रविवार हे नेमलेले दिवस सोडूनहि नेहमी कोणी ना कोणीतरी वैद्यकीय सल्ल्याकरिता त्यांच्यामागे असतच. पुढे पुढे तर हे प्रकरण इतके वाढले होते की शब्दश: त्यांना वीस वीस घंट्यांचा ताण पडे. पहाटे सहा वाजता एकदा जे हात पहावयास सुरुवात करावयाची ते रात्री दोन तीन वाजता शेवटच्या माणसाची बोळवण करून दार लावावयाचे असे घडत असे. परंतु इतकेहि असून ते कधी त्रासलेले दिसले नाहीत की थकलेले दिसले नाहीत. हसत खेळत थट्टामस्करी करीत ज्याच्या त्याच्या परी त्याला ते उपाय सांगत. स्वत: औषध कधी कोणास देत नसत. परलोकवासी गंगाधर शास्त्री जोशी अथवा दुसरे कोणी तरी जवळ बसलेले असे. त्यांच्याकडून लिहवून देत. होता होईल तो आयुर्वैद्यकांतील त्यातल्या त्यांत काष्ठौषधीच ते सांगत. औषधे सांगताना लोक किती क्षीण व दरिद्री होत ही गोष्ट लक्षांत घेऊनच विशेषत: ते सांगत. त्याशिवाय म्युनिसिपालिटी, सांगलीकरांसारख्यांची अपिले, सार्वजनिक सभा, पंचहौद प्रकरण, प्लेग, राष्ट्रीय चळवळ इत्यादि भानगडी होत्याच.

ते असेपर्यंत पुण्यांत अशी कोणतीच चळवळ नव्हती की जिच्याशी त्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काहीच संबंध नव्हता. परंतु पुढील आयुष्यांतील या सर्व चळवळीचा विशेष हा की त्यांतील कित्येक मोठमोठ्या चळवळी जरी त्यांच्या सल्याने होत असल्या तरी त्यांच्याशी त्यांचे अस्तित्व केवळ सल्ल्यापुरतेच अथवा फार झाले तर कायद्याची जबाबदारी उचलण्यापुरतेच असे. त्यांचा बहुतेक वेळ परोपकाराची कृत्ये करण्यांत, नुसते शरीरानेच नव्हे तर द्रव्यानेहि दुसऱ्याकरिता यथाशक्ति झिजण्यात व अनेक प्रकारची नित्यनैमित्तिक कृत्ये करण्यात जात असे. ह्या त्यांच्या धार्मिक जीवनाचा एक विशेष असा होता की इतरांस काय पण स्वकुटुंबियांसही कधी उपसर्ग लागू दिला नाही. मद्रासहून आल्यापासून श्राद्धाचे किंवा देवाच्या प्रसादाचे विशेष दिवस टाकले तर पान मांडून जेवण्याचे त्यांना ठाऊकच नव्हते. त्यांची सर्व आन्हिकें आटोपल्यावर रात्री दोनच्या सुमारास थोडी भाजीदशमी खात असत. सन १९०२ साली त्यांची पत्नी निवर्तली. त्यानंतर हळूहळू तिलाही फाटा मिळाला. पुढे ती अजिबात बंद होऊन भुईमुगाचे पाकविलेले दाणेच घेऊन खाणे हाच त्यांचा आहार होता. मद्रासेंतील झालेल्या जीवावरच्या दुखण्यामुळे व रक्तस्रावाच्या सवयीमुळे त्यांचे दात फार लवकर पडले. दाणे बारीक कुटून गूळ घालून लाडू करून ठेवलेले असत. त्यांतील एखाद दुसरा लाडू खाणे हाच त्यांचा आहार होता आणि पुढे पुढे तर तोहि नेमाने होत नसे. श्रीनरसिंह सरस्वती संस्थानचे अधिपति श्री. माधवबुवा गोडबोले यांच्याकरिता शेवटच्या दोन वर्षांत ते मधून मधून भगर वगैरे खात. परंतु असा प्रसंग तीनचार दिवसांनी केव्हातरी येत असे. एरवी दिवस दिवस शुद्ध जलाहारावरच जात. त्यामुळे घरच्या माणसास उपसर्ग होण्याचे कारणच नव्हते.

विश्रांतीकरिता आडवे गेले तरी यांना कधी निजलेले पाहिले नाहीं. अथवा यांचे दारहि कधी लागलेले कोणी पाहिले नाही. सारा कारभार उघड्यावर, वरच्या दिवाणखान्यात चालायचा. सारे पुणे यांचेच होते. कोणी कशाकरिता, कोणी कशाकरिता सारखे त्यांच्याकडे येत राहात व कोणी सल्ला, शास्त्रीय बाबी, प्रापंचिक भानगडी, वैयक्तिक तक्रारी, शंकासमाधन, मुलाखती, दर्शन, माहिती अशा अनेक निमित्तांनी त्यांच्याकडे कोवळ्या वयाच्या मुलांमुलींपासून तो मरणाच्या दाराशी आलेल्या म्हाताऱ्यापर्यंत कोणी ना कोणी तरी येत असे. त्यांच्याशी मतामतांतरे, पक्षोपपक्ष, गरीब व श्रीमंत, सुजनदुर्जन, स्वकीय परकीय अथवा जातपात इत्यादिकांचा कांहींच संबंध नव्हता. दिवस असो, रात्र असो, कुणाशी वर दिवाणखान्यांत, कुणाशी खाली चौकांत ज्याच्यात्याच्यापरी त्याला साह्य करून ते त्याला रवाना करीत. संस्था असोत, सरकारी अधिकारी असोत, क्रांतिकारी असोत, लो. टिळकांसारखी प्रेमांतली माणसे असोत, अथवा यांच्याविषयी आदर नसलेली इतर पक्षांतली माणसे असोत, सर्वांची संभावना दिवाणखान्यांतल्या एका सतरंजीवर अथवा चौकांतील पाळण्यावर होत असे.’

आयुष्याच्या या त्यांच्या भागांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे सार्वजनिक

गणपत्युत्सव ही होय. पूर्वी श्री गणपत्युत्सव फक्त मोठमोठ्या श्रीमंत व सरदार लोकांच्या घरीच होत असे. त्या उत्सवास सार्वजनिक स्वरूप देऊन त्याचा उपयोग राष्ट्रीय दृष्ट्या (राजकीय नव्हे) करून घेण्याची कल्पना श्री. अण्णासाहेब यांच्या डोक्यांत आली व सुप्रसिद्ध भाऊसाहेब रंगारी, काशीनाथ ठकूजी इत्यादि गृहस्थांना हाती धरून त्यांनी तिला मूर्तस्वरूप दिले. त्यानंतर लो. टिळकांनी या उत्सवास केवढे व्यापक स्वरूप आणले आणि पुढील दोन तीन पिढ्यांच्या देशभक्तीस तरी या उत्सवांतून चैतन्याचा पुरोठा कसा झाला हे सर्व सुप्रसिद्धच आहे.

अशा प्रकारचे त्यांचे दुसरे म्हणण्यासारखें कार्य म्हणजे स्वत: पुढे न येता आपल्या माणसांच्याकडून ठिकठिकाणी त्यांनी उत्पन्न केलेली जागृती. पुण्यांत उत्पन्न झालेली पंच हौद प्रकरण, काँग्रेसच्या भानगडी, प्लेगचे संकट, सुरत काँग्रेस, पिकेटिंगच्या चळवळी इत्यादि अनेक लहानमोठ्या चळवळीस त्यांचा पाठिंबा होताच - राष्ट्रीय पक्षाची मोठी सभा म्हटली म्हणजे बहुधा अण्णासाहेब अध्यक्ष असायचेच. प्लेगच्या भयंकर आपत्तीचे आणि त्या निमित्ताने इंग्रजाने सुरू केलेल्या अमानुष छळाचे निवारण करण्याकरिता रँड साहेबास शासन करून चाफेकर बंधूंनी आपले स्वत:चे बळी दिले. याच्या मुळाशी अण्णांसाहेबांची प्रेरणा होती असे म्हणण्यास पुरावा नाही. परंतु या घटनेचे त्यांना पूर्वज्ञान होते हे मात्र खास चाफेकर बंधूंनी दृढ संबंध असलेले व पुढे भटजी या नावाने सुप्रसिद्ध झालेले श्री. दामोदर बळवंत भिडे यांना अण्णासाहेबांनीच वऱ्हांडात पाठविले. गेल्या ३०-४५ वर्षातील वऱ्हाडांतील बहुतेक सर्व मोठ्या कार्यकर्त्यांची पूर्व तयारी या भटजींच्या सान्निध्यांतच झाली असे म्हटले तर अतिशयोक्ति होणार नाही. यवतमाळचे परलोकवासी शामराव प्रल्हाद देशपांडे, आजचे लोकनायक बापूजी अणे, बाबासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, पन्नालाल व्यास, नागपूरचे डॉ. परांजपे अशी किती नावें सांगता येतील की ज्यांनी भटजींच्या सान्निध्यात काठीलाठी आणि दांडपट्टा यांचे शिक्षण घेऊन स्वातंत्र्यप्राप्तीची अनेक मनोराज्ये केली. अशीच अण्णासाहेबांपासून ज्योत पेटवून घेतलेली माणसे इतरत्रही पसरलेली होती. त्यांच्याद्वारें इंग्रजांच्या दडपणानें निराश न होता आणि त्यांच्या बुद्धिबळाने दिपून न जाता अस्मितेची जागृती राखण्याचे आणि साधनांतरे केवढीह झाली तरी उत्सवाची दुर्दम्य लाट उसळती ठेवण्याचे मोठेच कार्य झाले आहे.

अण्णासाहेबांनी व मी कामाची वाटणी करून घेतली आहे असे लोकमान्य विनोदाने म्हणत ते शब्दश: खरे आहे. लोकमान्यांवर त्यांचा पराकाष्ठेचा लोभ होता व त्यांची कीर्ति वाढत राहावी म्हणून ते ईश्वराची प्रार्थनाहि करीत. लोकमान्यहि त्यांच्या कोणत्याही खटाटोपांत घरच्या माणसांप्रमाणे त्यांचा सल्ला व संमति घेत. १९१४ साली लोकमान्य मंडालेहून सुटून आले तेव्हा अण्णासाहेबांस अतिशय हर्ष झाला. लोकमान्यहि रीतीप्रमाणे श्री गजाननाचे दर्शन घेऊन प्रथमत: श्री अण्णासाहेब यांना नमस्कार करण्यास


आले. गीता रहस्य प्रसिद्ध झाल्यावर लोकमान्यांनी प्रथमतः ते पंढरपुरास जाऊन पांडुरंगाच्या चरणी अर्पण केले. दुसरी प्रत श्री गजाननास अर्पण केल्यावर तिसरी त्यांनी श्री अण्णासाहेबांच्या हातात दिली. श्रीमान् दादासाहेब खापर्डे, ज्यांना केर हार्डीने जिवंत अर्थकोश म्हणून संबोधिले ते नामदार गोखल्यांचे आद्य गुरु श्री गणेश व्यंकटेश जोशी हे तर त्यांचे भक्त होते. या सर्व मंडळींच्याद्वारे त्यांनी काहीहि केले असले तरी स्वतः मागे राहूनच ते केले आहे. त्यावेळी नुकतेच हिंदुस्थानांत परत आलेले श्री. गांधी यांची गाठ पडली होती. त्यांच्याविषयी त्यांनी एकंदर चांगले मत दिले होते परंतु पुढे हा शामळेपणा करील असेंहि स्पष्ट भविष्य सांगितले होते. अशा रीतीने सुमारे छत्तीस वर्षांचा काळ कालिदासाने म्हटल्याप्रमाणे 'स्वसुख निरभिलाषः खिद्यते लोकहेतोः ।' म्हणजे स्वतःच्या संबंधी यत्किंचितहि विचार न करता भारतवर्षांच्या भवितव्याची चिंता करीत करीत व आयुष्य प्रत्येक क्षण दुसऱ्याकरिता झिजवीत सन १९१७ फेब्रुवारी २ शुक्रवारी या दिवशी प्रातःकाळी साडेआठ वाजता जड शरीराचा त्यांनी त्याग केला. त्यांची शरीरप्रकृती चांगली होती व त्यांना काही रोगराईहि झालेली नव्हती. लोकमान्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांनी प्रायोपवेशन करून आपल्या स्वतःच्या इच्छेने देह ठेवला.

त्यांची स्वतःची राहणी अगदी साधी होती. घरात असताना एक पंचेवजा साधे धोतर नेसलेले असावयाचे. याशिवाय अंगावर दुसरे काही बहुतकरून नसेच. बाहेर जाताना सरदारी पद्धतीप्रमाणे रेशीमकाठी धोतर, अंगात छदीदार अंगरखा, जरीचे उपरणे व डोक्यास लाल पागोटे अीण हातात काठी असा त्यांचा वेष असे. भाषण अगदी स्पष्ट, सरळ आणि काहीना काही तरी बोध होईल असें असें. त्यांना विनोदाची फार आवड होती. त्यामुळे काहीना काहीं तरी थट्टामस्करी करीत असावयाचे. त्यांच्या विभूतिमत्वामुळे त्यांच्या सान्निध्यांत येणाऱ्या माणसांना सहजच एक प्रकारची भीति वाटत असे परंतु ते स्वतः कधी कोणावर रागावत नसत. लहान मुलांचे कौतुक करावे त्याप्रमाणे नेहमी प्रसन्न आणि सस्मित मुद्रेने ते दुसऱ्याकडे पाहात. त्यांची दृष्टि भेदक परंतु अतिशय दयार्द्र अशी असे.

त्यांचा दैनंदिन कार्यक्रम सांगण्याजोगताच आहे. तुमचे आमचे सर्व लोकांचे दिनमान सूर्याच्या उदयास्तावर बसलेले असते. सूर्य उगवला की आपला दिवस सुरू होतो आणि मावळला म्हणजे रात्र सुरू होते. त्यांच्या स्वतःच्या जगांत दिवसरात्रींना फारसे स्थान नव्हते. ते लोकांपुरतेच होते. त्यांचे सर्व दिनमान त्यांच्या आन्हिकांवर बसविले होते. सर्व आन्हिक पुरे झाले म्हणजे त्यांचा दिवस होत असे, व मग कुठे ते विश्रांतीकरिता अर्धापाऊण तास आडवे होऊन आपला जप करीत असत. तेवढी विश्रांति झाली की नवा दिवस सुरू होई. प्रथमतः प्रातःस्मरण वगैरे उरकल्यानंतर, रामनाम लिहावयाचे, इतके होईपर्यंत कोणीतरी कामाकरिता त्यांचेकडे येत असे, त्यांच्याशी बोलावयाचे. रविवार, गुरुवारचे दिवस असल्यास नाडीपरीक्षेस सुरुवात होई. नाडीपरीक्षेचे एक तंत्रच असे. पन्नास

पन्नास हात एकामागून एक पाहून टाकीत आणि मग औषधे सांगत. एकदा ही बाहेरची कामे सुरू झाली म्हणजे ती सारखी दिवस दिवस सुरू राहात. त्यातच दिवाणखान्यातील श्रीनरसिंह सरस्वतींच्या तसबिरीला भस्म लावून तास तास काही म्हणत उभे राहणे, श्रीनाथभागवत, श्रीस्वात्मसौख्य, श्रीज्ञानमोदक व श्रीतुकाराममहाराजांचे नित्यपाठाचे अभंग (१२ अभंग) यांचे मधून मधून वाचन होई. म्युनिसिपालिटीत असत तोपर्यंत म्युनिसिपालिटीची कामे, कुठे सभेस जावयाचें असल्यास सभा, अथवा कोणाचा हात पहावयास त्याचेकडे जाऊन येणे इत्यादि कामे त्यांतच होत. इतके सर्व होऊन वेळ सांपडला म्हणजे देवदर्शने सुरू होत. परंतु दिवसाच्या भानगडी उरकता उरकता देवदर्शनास बहुधा रात्र होत असे. मधल्या वेळांत मंडळींनी फारच आग्रह केला तर एखाद दुसरे केळ अथवा थोडे दूध घेतले जाई. देवाला जाताना खिशात थोडे तांदूळ टाकून जात. बरोबर बहुतकरून दोन-चार मुले अथवा भाऊसाहेब गोखले, दामोदरपंत भिडे इत्यादि मंडळी असत. रात्री पोलिसचा उपद्रव होऊ नये म्हणून एखादा कंदीलहि असे. काशीकरांचा विष्णू, श्री गुंडगणपति, कसब्याचा गणपति, जोगेश्वरी, भिकारदासचा मारुती, शनिवारचा मारुति आणि ओंकारेश्वर हे सारे पुणे रोज पायाखाली असे, विशेष प्रसंगाने इतर देवासही जात. एकदा गणपतीला प्रदक्षिणा घालू लागले म्हणजे त्यांच्या बरोबर राहणे चांगल्या ताकदवान माणसालाहि जड जाई. हे सर्व कार्यक्रम आटोपले, म्हणजे मग आंघोळ होत असे. आंघोळ झाल्यावर तुळशी वृंदावनांतील गजाननापाशी ओलेत्यानेंच तीन तीन तास बसत. नंतर औदुंबर प्रदक्षिणा वगैरे कार्यक्रम होऊन देवघरांत येत. देवावर बेल, तुळशी, फुले वगैरे वाहिल्यावर श्रीगुरुचरित्राच्या काही ओव्या वाचीत, परंतु इतके सर्व होता होता मध्यंतरी तुमच्या आमच्या दिनमानाचे तीन तीन दिवसहि निघून जात. असा दिवस पार पडला म्हणजे एखाददुसरा दाण्याचा लाडू वगैरे स्वत: अथवा श्री. माधवबुवा गोडबोले यांचेबरोबर बसून फराळ करीत व विश्रांतीकरिता पूर्वी सांगितल्याप्रमाणे आडवे होऊन जप करीत. इतके सर्वहि सर्व भारतवर्षाच्या व वैदिकधर्माच्या अभ्युदयाच्या संकल्पानेच होत असे. सर्वांकरिता सर्व व सर्वांमिळती आपण हे त्यांच्या सर्व वागण्याचे मुख्य सूत्र होते. अशाप्रमाणे त्यांचा दिवस नीट रीतीने पार पडला म्हणजे मग ते मोठ्या संतोषाने अर्धापाऊण घंटा विश्रांति घेत. आपणहि या ठिकाणी आता त्यांच्या या अल्प चरित्राचे चिंतन करीत संतोषाने विश्रांति घेऊ. विद्वत्ता वगैरे यांच्या व्यक्तित्वाचीं अनेक अंगे, अनेक विषयांवरील त्यांची मतें व अनुभव, त्यांच्या धार्मिक व पारमार्थिक प्रतीति, वैद्यक व वकिली यांतील त्यांचे कौशल्य इत्यादि अनेक विषयांची सविस्तर माहिती श्री. अप्रबुद्ध यांनी लिहिलेल्या त्यांच्या मोठ्या चरित्रांत वाचावयास मिळेल.

इतिशम्



महर्षी अण्णासाहेब पटवर्धन, समाधी दर्शन

ओंकारेश्वर, पुणे.